03:41:59 PM

नि.दि. दावा क्र.३५/२०१७

धिरजकुमार वि शिवाजी

निशाणी क्र.८९

**वादीतर्फे सा.क्र.२**

| | | |
|---|---|---|
| **साक्षीदाराचे नाव** | :- | पुनमचंद जगनलाल पिरथानी |
| वडीलांचे **पुर्ण नाव** | :- | जगनलाल किसनलाल पिरथानी |
| **वय** | :- | ८३ वर्षे, |
| **व्यवसाय** | :- | व्यवसाय |
| **राहणार** | :– | खांडसारी, कन्नड, ता.कन्नड जि. छ.संभाजीनगर |

**सरतपास वादीतर्फे सा.क्र.२ तर्फे विधिज्ञ श्री.एम.एम.भारुका यांच्यामार्फत**

१. बाबुलाल किसनलाल पिरथानी यांना मी ओळखतो. ते माझे सख्खे चुलते आहेत. मला त्यांची मिळकतबाबत माहिती आहे. त्यांनी स्वतःहून ती मिळकत कमावून ठेवलेली आहे. ती मिळकत टिळकनगर, कन्नड येथे असून तीचा जूना क्र.१४६ ते १५८ आहे व नवा क्र.३/२९४ व २९५ आहे. त्यांना शारिरीक त्रास नव्हता मात्र, चालताना त्यांच्यासोबत कोणीतरी लागायचे. शेवटपर्यंत त्यांची मानसिक स्थिती चांगली होती. बाबुलाल यांचा मुलगा लक्ष्मणदास हा मुका होता त्यामुळे त्यांनी त्यांची मिळकत त्यांचा नातू धिरजकुमार याला दिली. त्यावेळेस त्यांचे वय ७१ होते.

२. त्यांनी नोंदणीकृत मृत्यूपत्र करुन मिळकत दिली. माझे चुलते वयोवृध्द असल्यामुळे मी त्यांच्यासोबत जात होतो. मृत्यूपत्राचा दस्त प्रेमप्रकाश दगडुलाल सेठी यांनी बाबुलाल यांच्या सांगण्यावरुन लिहला. त्यावेळेस माझी चुलती रामज्योतबाई बाबुलाल, जगनदास लक्ष्मणदास म्हणजे उमाबाईचे वडील, उमाबाईचे आजोबा राधेशाम फतेचंद, तसेच बाबुलाल यांचा तिसरा मुलगा सुभाष बाबुलाल पिरथानी असे हजर होते. मृत्यूपत्र लिहून झाल्यावर सेठी यांनी ते बाबुलाल यांना वाचून

दाखविले. मृत्यूपत्र झाले त्यावेळेस मी बाबुलाल यांच्यासोबत निबंधक कार्यालयात होतो. मृत्यूपत्रबाबतचे कामकाज माझ्यासमक्ष झालेले आहे. आता मला दाखविण्यात आलेले निशाण ७० वरील मृत्यूपत्र तेच आहे. ते मृत्यूपत्र दि.२१ मार्च १९९२ रोजी करण्यात आले. मृत्यूपत्रावर बाबुलाल, साक्षीदार म्हणून माझी चुलती रामज्योतबाई हिचा अंगठा आहे, राधेलाल फतेचंद, सुभाषचंद बाबुलाल, जगन्नाथ लक्ष्मणदास यांच्या सह्या आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

**उलटतपास प्रतिवादी यांच्यातर्फे विधिज्ञ श्री.निंभोरकर यांच्यामार्फत**

३. माझे शिक्षण बी.कॉम एल.एल.बी.पर्यंत झालेले आहे. हे खरे आहे की, बाबुलाल आणि जगनलाल हे सख्खे भाऊ होते. हे खरे नाही की, मला जगनलाल यांनी दत्तक घेतलेले आहे. उमाबाई यांना एक मुलगा आणि चार मुली होत्या. मुलींचे नाव ज्योती, छाया आणि दोन मुली वारलेल्या आहेत. हे खरे आहे की, उमाबाई मयत आहेत. हे खरे आहे की, मृत्यूपत्राआधारे उमाबाई आणि धिरजकुमार यांना मिळकत दिल्याचे नमूद आहे. हे खरे नाही की, उमाबाईच्या पश्चात चारही मुली आणि धिरज वारस आहेत. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, त्यांनी धिरजला अधिकार दिलेले आहेत.

४. त्या मुलींनी तोंडी सांगितल्यामुळे अधिकार दिल्याबाबत तोंडी सांगत आहे. हे खरे आहे की, मुलींनी आजपर्यंत अधिकारपत्र दिल्याबाबत काही लेखी दस्त केलेला नाही. हे खरे नाही की, उमाबाईच्या पश्चात चारही मुली मालक आहेत. हे खरे नाही की, कोणतेही अधिकारपत्र मुलींनी दिलेली नाही. बाबुलाल यांनी मिळकत कोणाकडून घेतली याबाबत मला माहिती नाही. हे खरे आहे की, टिळकनगर येथे रस्त्याच्या पूर्वेला असणारी जागा पिरथानी कुटूंबाची आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, तिवारी यांची देखील जागा आहे त्यानंतर पिरथांनी कुटूंबाची जागा आहे. वाद मिळकत बाबुलाल यांनी स्वतः कमवली असा दस्त मी पाहिलेला नाही.

५. हे खरे आहे की, माझे आणि बाबुलाल यांचे संबंध पहिल्यापासून

चांगले आहे.

प्रश्न–बाबुलाल कन्नड येथे कोणाकडे उपचार घ्यायचे ?

उत्तर–डॉ.त्रिवेदी, डॉ.मिशरीकोटकर काही वेळा सरकारी दवाखान्यात देखील जायचे.

६. त्यांची तब्येत चांगली होती असे प्रमाणपत्र मृत्यूपत्रासोबत जोडले नव्हते. हे खरे आहे की, मी आणि माझा मुलगा प्रकाश एकत्रात राहतो. हे खरे आहे की, दावा मिळकत अब्दुल जावेद याला वादीने विकली होती. हे खरे आहे की, अब्दुल जावेद हे नगरपरिषदचे उपाध्यक्ष होते. हे खरे नाही की, दि.३१ मार्च १९८२ रोजी कोणताही कागद झाला नाही. हे खरे नाही की, मी त्यावेळेस मी हजर होतो अशा अनुषंगाने सरतपासात लिहलेला सर्व मजकूर खोटा आहे. हे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**फेरतपास नाही**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2025.08.07 18:53:02 +0530

कन्नड. (वि. द. पाटील)

दिनांक : ०७/०८/२०२५ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

04:12:51 PM कन्नड.

**CERTIFICATE**

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | |
|---|---|
| Name of Stenographer | V. D. Khambat, (Grade-III) |
| Court | Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Kannad |
| Date | 07.08.2025 |
| Order signed by the Presiding Officer | 07.08.2025 |
| Order uploaded on | 07.08.2025 |